निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
श्री. अनिल चंद्रसेन धनवटे, तत्कालीन
कनिष्ठ सहाय्यक,गट शिक्षण विभाग
कार्यालय समिती संगमनेर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-३/२४३०१८७/१८२/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेनुसार

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्रं.आस्था-३/७५/२००७ दिनांक २८/०१/२००८
२. इकडील दोषारोपपत्र १ ते ४ क्र.आस्था-३/२९४/२०१४ दिनांक ०५/०४/२००८
३. इकडील पुनस्थापित करणे बाबत आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/७१/२००९ दिनांक ०६/०२/२००९
४. सहाय्यक आयुक्त(चौ) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल पत्र क्र.विशा-४/खाचौ/सी.आर-१५/०९ दिनांक २८/०७/२००९
५. श्री धनवटे यांचा खुलासा दिनांक १४/१०/२००९
६. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/७३१/२०१० दिनांक १५/०१/२०१०
७. श्री धनवटे यांनी मा.अपर आयुक्त नाशिक यांचेकडे केलेले अपिल क्र.इएमपी/ अपिल क्र.३३/१० दिनांक २९/०९/२०१०
८. मा अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील निका पत्र जा.क्र.इमपी अपिल क्र.३३/१० दिनांक १५/०२/२०१०
९. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/२५८/२०११ दिनांक १९/०३/२०११
१०. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/२४३०१८७/१२४८/२०२५ दिनांक २७/१२/२०२५
११. ग.वि.अ, पं.स.कोपरगाव यांचेकडील पत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-१/२८१/२०२६ दि- २०/०२/२०२६ समवेत श्री धनवटे यांचा खुलासा दि- १३/०२/२०२६
१२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)

श्री अनिल चंद्रसेन धनवटे, हे कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर गट शिक्षण कार्यालय, पंचायत समिती संगमनेर, येथे कार्यरत असताना दिनांक ०९/०८/२००५ ते दिनांक २६/११/२००७ या कालावधीत वेळोवळी अनधिकृत गैरहजर राहिल्याने संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक २ अन्वये दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत आले. सदरचे दोषारोपपत्र अमान्य केलेने प्रकरणी विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आली. संदर्भ क्रमांक ४ नुसार प्राप्त चौकशी अहवालानुसार श्री धनवटे यांना कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली. सदर नोटीशीस श्री धनवटे यांनी संदर्भ क्रमांक ५ अन्वये खुलासा सादर केलेला होता. विभागीय चौकशी अहवालाशी सहमती दर्शवुन संदर्भ क्रमांक ६ च्या आदेशानुसार श्री धनवटे यांना मुळ वेतनावर आणणेची शिक्षा करणेत आलेली होती.

संदर्भ क्रमांक ७ नुसार श्री धनवटे यांनी संदर्भ क्रमांक ६ च्या आदेशा विरुध्द अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडे अपिल दाखल केले होते. संदर्भ क्रमांक ८ नुसार अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील निकाल प्राप्त होऊन श्री धनवटे यांचे अपिल अंशत: मान्य केले. संदर्भ क्रमांक ९ च्या आदेशान्वये श्री धनवटे यांची पुढील वेतनवाढ तीन वर्षाकरीता कायमस्वरुपी बंद करणेची शिक्षा करणेत आलेली आहे.

तरी श्री धनवटे यांचा दिनांक २८/०१/२००८ ते दिनांक २६/०२/२००९ अखेर एकुण ३९५ दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती. संदर्भ क्रमांक १० नुसार श्री धनवटे यांना नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. संदर्भ क्रमांक ११ नुसार श्री धनवटे यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेमार्फत खुलासा सादर केला. श्री धनवटे यांनी त्यांचा खुलासा मान्य करणेत येऊन त्यांचा सेवा निलंबन कालावधी हा सेवाकाळ म्हणुन नियमित करणेस विनंती केलेली आहे.

श्री. धनवटे यांना सदर प्रकरणी त्यांची पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने तीन वर्षाकरीता रोखुन ठेवण्याची शिक्षा करणेत आलेली असलेने त्यांचे निलंबन समर्थनीय ठरत आहे. त्यामुळे श्री. धनवटे यांचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. सबब, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहुन श्री अनिल चंद्रसेन धनवटे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, गट शिक्षण कार्यालय, पंचायत समिती संगमनेर, यांचा दिनांक २८/०१/२००८ ते दिनांक २६/०२/२००९ अखेर एकुण ३९५ दिवस कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री अनिल चंद्रसेन धनवटे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती कोपरगाव यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक .........20260401040060................ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 01-04-2026 13:14:23

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री अनिल चंद्रसेन धनवटे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती कोपरगाव

द्वारा व प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती कोपरगाव

२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- निवडनस्ती.

(स्वाक्षरी /---)
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर